# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

(2015-डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष)


अधिसूचना

क्रमांक : २अ/एडीएम/२०१५/०८०५

दिनांक : - 5 JUN 2015

पहा : सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७

शासनाने उपरोक्त अध्यादेश दिनांक २१.५.२०१५ रोजी निर्गमित केला असून महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत , खाजगी व्यावसायिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अध्यादेशातील प्रकरण २ च्या कलम ६ (ख)अन्वये खालील बाब नमूद केली आहे.

"(ख) एखाद्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेतील प्रवेश, राज्य शासनाच्या धोरणानुसार देण्यात येतील आणि मंजूर प्रवेश क्षमतेच्या एकावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या जागांवरील प्रवेश हे , ती संस्था ज्या अल्पसंख्यांक समाजाची असेल अशा , राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांमधून सामायिक प्रवेश परीक्षेमधील गुणवत्तेच्या आधारे परस्पर देण्यात **येतील**;

परंतु, एखाद्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेतील अल्पसंख्याक प्रवर्गासाठी राखून ठेवलेली कोणतीही जागा, एखाद्या शैक्षणिक वर्षात भरावयाची राहून गेल्यास किंवा निवडीनंतर विद्यार्थी ती संस्था सोडून गेल्यास त्या बाबतीत, न भरलेल्या रिक्त जागा, कलम १० च्या पोट-कलम (४) च्या तरतुदींना अनुसरून घेतलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणवत्ता यादीच्या आधारे , ज्या अल्पसंख्यांक प्रवर्गाची ती संस्था असेल त्या अल्पसंख्यांक प्रवर्गामधून भरण्यासाठी राज्यशासनाच्या सक्षम प्राधिका-याकडे परत करण्यात **येतील**.

परंतु आणखी असे की, त्यानंतरदेखील त्या जागा भरल्या गेल्या नसतील तेव्हा, अशा भरल्या न गेलेल्या जागा, सक्षम प्राधिकायाने घेतलेल्या सामायिक प्रवेश परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारावर,सर्वसाधारण प्रवर्गामधील विद्यार्थ्यांमधून भरण्यात येतील;

परंतु, तसेच, जर अशा संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षात तिच्या मंजूर प्रवेशक्षमतेच्या किमान एकावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्याक प्रवर्गातील व्यक्तींमधून देण्यात कसूर केली तर, अशी संस्था, राष्ट्रीय अल्पसंख्याक शिक्षण संस्था आयोग अधिनियम, २००४ याच्या कलम १२ग खालील कारवाईस पात्र ठरेल. "

वरील तरतूदींचे अवलोकन करून त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

त्याअनुषंगाने सर्व अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या अल्पसंख्यांक कोटयातील भरल्या न गेलेल्या रिक्त जागा (पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका अभ्यासक्रमांच्या ) या राज्य शासनाच्या सक्षम प्राधिकारी म्हणून संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य यांचेकडे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीच्या जागा वाटपाच्या (seat distribution) दिनांकाच्या दोन दिवस अगोदर पर्यंत समर्पित कराव्यात जेणेकरून सदर जागांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या जागा वाटपामध्ये करण्यात येईल.ज्या संस्था यानुसार रिक्त जागा समर्पित करतील तेवढयाच जागा केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या माध्यमातून भरण्यात येतील.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई